**मंजुर विकास योजना पाचोरा (दु.सु+वा.ह)- ता. पाचोरा जि. जळगाव**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये आ.क्र.५० "प्राथमिक शाळा व क्रिडांगण" करीता आरक्षित क्षेत्र ०.४७ हे.आर जमिनीचा वापर रहिवास प्रयोजनार्थ करणेचा प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय,**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये, पुणे - ४११ ००१**

**निर्णय**: जा.क्र. डि.टी.पी./वि.यो. पाचोरा/कलम-५०(२)/ आदेश / प्र.क्र. १०३८ /टिपीव्ही-४/ ९८० **दिनांक** :२७.०२.२०२५.

सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी भाषेतील) महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

'A' प्रमाणे कार्यवाहीसाठी

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक,नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. ४८१ दिनांक- 05.03.25
संबधित अधि./कर्म.
न.र. 05/03/25 उ.सं.न.र.

(दे.व्यं. चावरे)
कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-४,
मुख्य कार्यालय, पुणे.

प्रति,

मा.व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** या कार्यालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक आणि सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव यांना पाठवाव्यात.

**प्रत माहितीस्तव सादर:-**

१.मा. अप्पर मुख्य सचिव (१),महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग(नवि-९),मंत्रालय, मुंबई-३२.

२.मा. सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.

३.मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

४.मा. जिल्हाधिकारी, जळगाव.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

५. मा. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेश अभिलेखार्थ त्यांचेकडील त्या संबंधीच्या संकलन नस्तीमध्ये जोडावेत. तसेच सदर आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. मा. सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव.

/-प्रस्तुत प्रकरणी त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **सहा** प्रती संचालनालयास विहीत मार्गाने त्वरीत सादर कराव्यात.

७. मुख्याधिकारी, नगर परिषद, पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

९. अध्यक्ष, नुतन महिला सर्वोदय बालविकास संस्था, पाचोरा, जि. जळगाव.

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
नगर रचना संचालनालय
तळमजला, मध्यवर्ती इमारत,पुणे, ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

**आदेश**

जा.क्र. डि.टी.पी./वि.यो. पाचोरा/कलम-५०(२)/ आदेश /
प्र.क्र. १०३८/टिपीव्ही-४/ ९८०

दि२७.०२.२०२५.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, पाचोरा या 'ब' वर्ग नगर परिषदेची विकास योजना, दुसरी सुधारित व वाढीव हद्द, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे **"उक्त अधिनियम"** असे संबोधिले आहे) चे कलम-३१(१) चे तरतूदीन्वये शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-३५१०/२७७२/ प्र.क्र.१८६/२०११/ नवि-०९, दि.०३.०४.२०१२ अन्वये भागशः मंजूर झाली असून, (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिले आहे) ती दि.१५.०५.२०१२ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** म्हणून संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौजा पाचोरा येथील गट नं. १०० पैकी (स.नं.४४ पैकी) या जमिनीमधील उक्त मंजूर विकास योजनेच्या अहवालानुसार सुमारे ४७०० चौ.मी. [मोजणीनुसारच्या परिगणनेनुसार सुमारे ४६४१ चौ.मी.] क्षेत्र (यापुढे **"उक्त जमीन"** असे संबोधिले आहे) आरक्षण क्र. ५० "प्राथमिक शाळा व क्रिडांगण" या करिता आरक्षित असून, (यापुढे **"उक्त आरक्षण"** असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासाकरिता समुचित प्राधिकरण "नुतन महिला बालविकास संस्था" आहे (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील जागेची त्यांचे संस्थेस आवश्यकता नसल्याचे, उक्त समुचित प्राधिकरणाच्या वतीने नुतन महिला बालविकास संस्था, पाचोरा यांनी पत्र क्र.१५४/२०२४, दि.१६.०५.२०२४ अन्वये संचालनालयास कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये सर्व नगर परिषदा/नगर पंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाच्या कलम ५०(२) चे तरतूदी अंतर्गत आरक्षण वगळण्याबाबत मंजूरी देण्याचे अधिकार उक्त अधिनियमाचे

कलम १५१ चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रत्यायोजित केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन उक्त आरक्षणाखालील संपुर्ण क्षेत्र उक्त आरक्षणातून रद्द करणेबाबत समुचित प्राधिकरणाच्या वतीने नुतन महिला बालविकास संस्था, पाचोरा यांचे पत्र क्र.१५४/२०२४, दि.१६.०५.२०२४ अन्वये संचालनालयास पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्राप्त झाले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, पाचोरा यांनी पत्र क्र.९९९, दि.२३.०८.२०२४ अन्वये उक्त जमिनीवरील उकत आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम-५० चे तरतूदीन्वये वगळण्यास नगर परिषदेची काहीही हरकत नसल्याबाबतचा अहवाल सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा यांना सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.२०८०, दि.२७.०९.२०२४ अन्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम-५० चे तरतूदीन्वये वगळण्यास हरकत नसल्याबाबत अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त जमीन ज्या कारणासाठी आरक्षित केली आहे, त्या कारणासाठी उक्त समुचित प्राधिकरणास आवश्यकता नसल्याची खात्री पटल्यावरुन उक्त जमीन उक्त आरक्षणामधून उक्त अधिनियमाचे कलम ५०(२) चे तरतूदीन्वये वगळणेचा प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक असल्याचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा यांनी त्यांचेकडील पत्र क्र.७७, दि.१६.०१.२०२५ अन्वये शासनाच्या दि.२०.०४.२०१६ रोजीच्या शासन निदेशानुसार उक्त जमिनीचे जमीन मालक यांनी (यापुढे **"उक्त जमीन मालक"** असे संबोधिले आहे) वार्षिक दर तक्त्यानुसार येणाऱ्या जमीन मूल्याच्या ५% दराने येणाऱ्या अधिमूल्य रक्कमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रु.१,६३,५००/- शासकीय कोषागारात दि.१३.०१.२०२५ रोजी आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रु.१,६३,५००/- नगर परिषद, पाचोरा यांचेकडे दि.१३.०१.२०२५ रोजी जमा केली असल्याचे संचालनालयास कळविले आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ५०(२) चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे उक्त जमिनींपुरते उक्त आरक्षण उक्त मंजूर विकास योजनेच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे वगळण्यास मंजूरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत;

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या

नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

परिशिष्ट

| अ. क्र. | नगर परिषद, गांव, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त जमिनींचा तपशिल | उक्त आरक्षणातून वगळलेले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद, पाचोरा<br>मौजे पाचोरा, ता.पाचोरा, जि.जळगाव. | आरक्षण क्रमांक-५०, " प्राथमिक शाळा व क्रिडांगण "<br>क्षेत्र -४७०० चौ.मी. | गट नं. १०० पैकी (स.नं.४४ पैकी) | क्षेत्र -४६४१ चौ.मी. |

टिप :-

१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

२) उक्त आरक्षणातून वगळलेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, नगर परिषद, पाचोरा, जिल्हा जळगाव यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३) सदर आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

TRUE COPY

TOWN PLANNER
C/o. DIRECTORATE OF TOWN
PLANNING, M. S. PUNE.

Government of Maharashtra

**Town Planning and Valuation Department**

**Directorate Of Town Planning**

Ground floor, Central Building, Pune 411 001

**Telephone No. 020-26122076** **Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in**

**ORDER**

No. D.T.P/ D.P. Pachora / Site No.15/ Sec 50(2)/C.R.1038/TPV-4/ 980 Date27.02.2025

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

Whereas, the Development Plan, Second Revised and Additional limit of 'B' Class Municipal Council, Pachora has been partly sanctioned under the provisions of section 31(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as **"the said Act"**) by the Government in Urban Development Department vide Notification No.TPS-3510/2772/CR-186/2011/UD-9, dt. 03.04.2012 (hereinafter referred to as **"the said Notification"**) and come into force with effect from 15.05.2012 (hereinafter referred to as **"the said sanctioned Development Plan"**);

And whereas, in the said sanctioned Development Plan, the land bearing Gat No. 100 Part (S.No. 44 Part), admeasuring an area approximately 4700 sq.m. as per the said Sanctioned Development Plan Report [4641 sq.m. as per calculations from measurement plan] of Mouja Pachora ( hereinafter referred to as " **the said Land**") is reserved for "Primary School & Playground" as Site No.50 (hereinafter referred to as **"the said Reservation"**) and "Nutan Mahila Bal Vikas Sansta" is the Appropriate Authority for acquisition and development of the said Reservation (hereinafter referred to as **"the said Appropriate Authority"**) ;

And whereas, the Nutan Mahila Bal Vikas Sansta, Pachora, on behalf of the said Appropriate Authority, vide letter No.154/2024, dated16.05.2024 has informed to the Directorate of Town Planning that, the said Land under the said Reservation is not necessary for their institution;

And whereas, as per the provisions of setion 151 of the said Act, the Government in Urban Development Department vide Government Resolution No. TPS-1813/3211/CR-508/UD-13, dt.01.12.2016 has delegated the powers exercisable by it under the provisions of section 50(2) of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in

respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans under taken by Zilha Parishad as a Planning Authority;

And whereas, to the effect that, in accordance with the above Government decision, regarding deletion of the entire area under the said Land from the said Reservation, the Nutan Mahila Bal Vikas Sansta, Pachora on the behalf of the said Appropriate Authority has informed vide letter No. 154/2024, dated16.05.2024 to the Directorate for further necessary action;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Pachora vide its letter No.999, dated 23.08.2024 has submitted the report to the Assistant Director of Town Planning, Jalgaon Branch that, Muncipal Council has no objection for the deletion of the said Reservation on the said Land under the provisions of section 50 of the said Act;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Jalgaon Branch, Jalgaon has submitted a report vide its letter No.2080, dated 27.09.2024 stating it's no objection to delete the said Reservation on the said Land;

And whereas, after making necessary enquiry, it is satisfied that, the said Reservation on the said Land is no longer required to the said Appropriate Authority and the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, the proposal of the deletion of the said Reservation on the said Land under the provisions of section 50(2) of the said Act should be sanctioned;

And whereas, the Assistant Director, Town Planning, Jalgaon Branch vide its letter No.77, dated 16.01.2025 communicated to the Directorate that, out of the 5% of amount of premium of the value considering the land rates in Annual Statement of Rates (ASR) as per the Government directives dated 20.04.2016, the land owner of the said Land ( hereinafter referred to as "**the said Land Owner**") have deposited the 50% premium amount of Rs.1,63,500 /- payble to the Government with Government treasury on 13.01.2025 and the remaining 50% premium amount of Rs.1,63,500/- payble to the Planning Authority with the account of Chief Officer, Municipal Council, Pachora on 13.01.2025;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby sanctions the part deletion of the said Reservation in respect of the said Land under the provisions of section 50(2) of the said Act as shown in the Part Plan of the said Sanctioned Development Plan & for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as specified in the Schedule herein below:-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

**SCHEDULE**

| Sr. No. | Municipal Council, Village, Talula and District. | Reservation in the saidsanctioned Development Plan & its Approximate Area as per D.P. Report | Description of the said Lands | Approximate Area deleted from the said Reservation |
|---|---|---|---|---|
| 1 | Municipal Concil, Pachora<br>Mouja-Pachora, Taluka- Pachora, District.- Jalgaon. | Site No.50 "Primary School & Playground" Area 4700 sq.m. | Gat No. 100 Part (S.No. 44 Part) | Area 4641 sq.m. |

**Note:-**

1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.
2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is deleted from the said Reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Pachora, Dist. Jalgaon during office hours on all working days for inspection to public up to One month.
3) This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**

TRUE COPY

TOWN PLANNER
C/o. DIRECTORATE OF TOWN
PLANNING, M. S. PUNE.

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.